■ POSTEL REGD NO. AKOLA DN./285/2025-2027

साप्ताहिक

स्थापना : जुन २००८

# पिंगलाक्षी एक्सप्रेस

मुख्य संपादक : गजानन बानोरे 9420100590, 9075407343 R.N.I. No. MAHMAR/2008/24720

● रिसोड जि.वाशीम ● वर्ष १८ ● अंक ४५ ● मंगळवार, दि. ३१ मार्च २०२६ ● पृष्ठे ४ ● किंमत १ रू.

# जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने उद्योजिका सौ. मीना गोपालराव जाधव यांना स्वयंसिद्धा पुरस्काराने सन्मानित

**रिसोड - दि.२८ डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाद्वारे विदर्भस्तरीय महिला सक्षमीकरण मेळावा व स्त्री शक्ती उत्सवाचे आयोजन शनिवारी, २८ मार्च रोजी सकाळी ११ वाजता कृषी महाविद्यालय अकोलाच्या स्व. के. आर. ठाकरे सभागृहात करण्यात आला होता. कुलगुरू डॉ. शरद गडाख यांचे अध्यक्षतेत हा सोहळा संपन्न झाला.**




याप्रसंगी महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेच्या व्यवस्थापकीय संचालक वर्षा लड्ढा, जिल्हाधिकारी वर्षा मीना, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम, परिविक्षाधीन सहाय्यक पोलिस अधीक्षक ईशानी आनंद, कार्यालयाचे तंत्र विद्यापीठ कार्यकारी परिषदेचे सदस्य या कार्यक्रमास उपस्थित होते. विस्तार शिक्षण संचालक डॉ. धनराज उंदीरवाडे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी अधिकारी विलास वाशिमकर, महिला महामंडळाच्या जिल्हा व्यवस्थापक वर्षा खोब्रागडे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा अकोला अंतर्गत उमेद अभियानाचे जिल्हा व्यवस्थापक नरेंद्र काकड यांचेसह विद्यापीठाच्या विस्तार शिक्षण संचालनालयाकडून नियोजन करण्यात आले आहे.

उत्सवात १५ वैदर्भीय रणरागिण्यांचा कार्यगौरव यामध्ये झालाअसून त्यांचा कार्याचा परिचय करून देणारी चित्रफित दाखवण्यात आली आहे.यावेळी जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने रिसोड तालुक्यातील या रिठद गावच्या तरुण उद्योजिका सौ.मिना गोपालराव जाधव यांनी रिसोड येथून जवळच असलेल्या करडा येथील केव्हीके अंतर्गत प्रशिक्षण घेतले असून त्याचाच फायदा म्हणून यांना डॉ. पंजाबराव कृषी विद्यापीठ अकोला येथे स्वयंसिद्धा पुरस्काराने सन्मानित केले आहे. त्यांनी आपल्या स्वतःच्या जागेत आईस्क्रीम, बेकरी यांचा व्यवसाय सुरू केला असून त्यांनी या व्यवसायामध्ये येथो शिखर गाठले आहे. व त्या चांगला व्यवसाय करत असून आपल्या व्यवसायाच्या माध्यमातून चांगले उत्पन्नही त्या घेत आहेत आपल्या व्यवसाय या पंचक्रोशी बाहेरही त्यांच्या आईस्क्रीम व बेकरीची मागणी असून दिवसेंदिवस आपल्या व्यवसायात वाढ करत असून त्यांच्या आईस्क्रीम व बेकरीची वाशिम, बुलढाणा व अकोला या जिल्ह्यात अनेक व्यावसायिक यांच्याकडून मालाची होत असून त्या त्यांना आपला माल विक्री करतात. त्यामुळे उद्योजिका सौ. मीना गोपालराव जाधव ह्या आपल्या सृष्टी आईस्क्रीम व बेकरी च्या माध्यमातून सन्मानास पात्र झाल्याने डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला येथे त्यांना स्वयंसिद्धा पुरस्कार २०२६ ने सन्मानित करण्यात आले. या सन्मानाचे श्रेय त्या आपले सासू-सासरे व पती यांना देतात.

## ■ ६ दिवसीय सांधेदुखी (जॉइंट रिप्लेसमेंट)

# तपासणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद



**रिसोड (प्रतिनिधी) ममता आणि मधुसूदन अग्रवाल फाउंडेशन मुंबई मुख्यमंत्री सहाय्यता निधी तर्फे २४ ते २९ मार्च २०२६ या कालावधीत बुलढाणा, हिंगोली व रिसोडे आयोजित करण्यात आलेल्या ६ दिवसीय सांधेदुखी (जॉइंट रिप्लेसमेंट) तपासणी शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.**

या शिबिरात एकूण ८४० रुग्णांची तपासणी करण्यात आली असून त्यापैकी २८६ रुग्णांना शस्त्रक्रियेची आवश्यकता असल्याचे निदान करण्यात आले. शिबिराच्या पहिल्या दिवशी बुलढाणा येथे १४३ रुग्णांची तपासणी करण्यात आली, त्यापैकी ३७ रुग्णांना शस्त्रक्रियेची गरज असल्याचे आढळले. दुसऱ्या दिवशी हिंगोली येथे १०१ रुग्ण तपासण्यात आले असून २६ रुग्णांना शस्त्रक्रियेचा सल्ला देण्यात आला. २६ ते २९ मार्च दरम्यान रिसोड येथे अनुक्रमे १२८, १२०, १६० आणि १८८ रुग्णांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी ५४, ५३, ५२ आणि ६४ रुग्णांना शस्त्रक्रियेची आवश्यकता असल्याचे स्पष्ट झाले. या शिबिरामुळे गंभीर सांधेदुखी व सांध्यांच्या विकारांनी त्रस्त असलेल्या रुग्णांची वेळेत ओळख होऊन त्यांना आवश्यक वैद्यकीय मार्गदर्शन मिळाले आहे.

ग्रामीण व शहरी भागातील नागरिकांपर्यंत अत्याधुनिक अस्थिरोग सेवा पोहोचविण्याच्या फाउंडेशनचा हा उपक्रम महत्त्वाचा ठरत आहे. या शिबिरामुळे रुग्णांच्या वेदना कमी करून त्यांची हालचाल सुधारण्यास तसेच जीवनमान उंचावण्यास मोठी मदत होणार असल्याचा विश्वास ममता मधुसूदन अग्रवाल फाउंडेशनचे अध्यक्ष श्री मधुसूदनजी अग्रवाल यांनी व्यक्त केला.

शिबिराच्या यशस्वीतेसाठी स्थानिक कोर कमिटीचे उत्तमचंदजी बगडिया, संजय उकळकर, संतोष वाघमारे,डॉ शारीरिक अन्सारी, दीपेन शर्मा, डॉ अजय पाटील, विनोद मोरे, आवेज खान, विठ्ठल वसू, संत अमरदास अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीचे सर्व कर्मचारी यांनी प्रयत्न केले.

# नदीम राही आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित




**रिसोड - दि. २८ मार्च २०२६ रोजी जिल्हा परिषद वरिष्ठ उर्दू प्राथमिक शाळा, चिंचांबाभर ता. रिसोड जि. वाशीम येथील कर्तव्यदक्ष व समर्पित शिक्षक नदीम राही सुलतानपुरी यांना छत्रपती संभाजीनगर येथील भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्र व सभागृह येथे आयोजित भव्य कार्यक्रमात अखिल भारतीय उर्दू शिक्षक संघाच्या वतीने आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.**

नदीम राही सुलतानपुरी हे एक आदर्श व प्रेरणादायी शिक्षक असून ते समाजात राहून शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने कार्य करीत आहेत. त्यांचे शैक्षणिक, सामाजिक आणि संस्कारक्षम कार्य समाजासाठी प्रेरणादायी असून त्यांनी पार पाडत असलेली अध्यापन व मार्गदर्शनाची जबाबदारी खरोखरच कौतुकास्पद व प्रशंसनीय आहे.

त्यांच्या या उल्लेखनीय शैक्षणिक सेवेची दखल घेऊनच त्यांना आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. या सन्मानाबद्दल नदीम राही यांनी अखिल भारतीय उर्दू शिक्षक १११३८ संघाचे राज्य सचिव व संस्थापक मा. साजिद निसार अहमद साहेब तसेच संपूर्ण संघटनेचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले.

# ■ अफवांना बळी पडू नका; इंधनाचा पुरेसा साठा उपलब्ध

## ■ जिल्हा प्रशासनाचे आवाहन

वाशिम,दि.२४ मार्च (जिमाका) जिल्ह्यातील सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, अलीकडे काही भागांत पेट्रोल पंपांवर पेट्रोल व डिझेलच्या खरेदीसाठी अनावश्यक गर्दी होत असल्याचे निदर्शनास आले आहे. याबाबत प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, जिल्ह्यात पेट्रोल, डिझेल आणि घरगुती एलपीजी यांचा पुरेसा साठा उपलब्ध आहे.

कोणत्याही प्रकारची तुटवडा परिस्थिती निर्माण झालेली नसून, नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये. घाबरून जास्त प्रमाणात इंधन खरेदी करण्यासाठी गर्दी करू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. आवश्यकतेनुसारच इंधन खरेदी करावी व प्रशासनास सहकार्य करावे. जिल्हा प्रशासनाकडून इंधनाचा पुरवठा सुरळीत राहण्यासाठी आवश्यक ती सर्व उपाययोजना करण्यात आलेली असून, नागरिकांनी संयम व जबाबदारीने वागावे, असे आवाहन करण्यात आले आहे. अशी माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी दीपक बाजड यांनी दिली आहे.

# जिल्ह्याजिल्ह्यांत नशामुक्तीचा संकल्प

भारत विकसित राष्ट्र बनविण्याच्या दिशेने वाटचाल करत असताना समाज नशामुक्त असणे अत्यावश्यक आहे. तरुण पिढीला व्यसनापासून दूर ठेवण्यासाठी आणि निरोगी समाज घडविण्यासाठी नशामुक्ती अभियान महत्त्वाची भूमिका बजावत आहे. जनजागृती, समुपदेशन आणि सामूहिक प्रयत्नांमधूनच व्यसनमुक्त भारताचे स्वप्न साकार होऊ शकते.

नशामुक्ती अभियान आपल्या भारत देशाच्या शतक महोत्सवी स्वातंत्र्याच्या वर्षापर्यंत विकसित भारत होण्यासाठी भारत सरकार प्रयत्नशील आहे. यासाठी देशातील सामाजिक परिस्थिती, पर्यावरणीय शाश्वतता, आर्थिक वाढ आणि सुशासन अशा विविध बाबींचा समावेश आहे. म्हणजे आपला देश एक विकसित राष्ट्र म्हणून ओळखला जाणार आहे; परंतु असे असले तरी त्या देशातील नागरिक नशामुक्त असले पाहिजेत तरच देश खऱ्या अर्थाने विकसित बनू शकतो. देशाच्या विकासासाठी नशामुक्ती होणे गरजेचे आहे. त्यासाठी देशात नशामुक्ती अभियानाच्या माध्यमातून प्रामाणिकपणे जनजागृती झाली पाहिजे. भारत सरकारच्या सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाने १५ ऑगस्ट २०२० रोजी देशात नशामुक्ती भारत अभियान सुरू केले. प्रथम देशातील २७२ जिल्ह्यांत हे अभियान राबविण्याचे निश्चित करण्यात आले होते. सध्या ३७२ जिल्ह्यांमध्ये नशामुक्ती अभियान राबविले जात आहे. आपल्या देशात सन २०२१ मध्ये ७५२ जिल्ह्यांची नोंद करण्यात आली आहे. उत्तर प्रदेश राज्यात सर्वात ७५ जिल्हे असून सर्वात कमी गोवा राज्यात २ जिल्हे आहेत, तर आपल्या महाराष्ट्र राज्यात ३६ जिल्हे आहेत. तेव्हा देशाच्या विकासाच्या दृष्टिकोनातून प्रत्येक जिल्ह्यात नशामुक्ती अभियान राबविणे गरजेचे आहे.

नशामुक्ती अभियानाचा मुख्य उद्देश मादक द्रव्यांपासून मुक्त करणे, तरुणाईला जागृत करणे आणि नशा व्यक्तींचे पुनर्वसन करणे ही आहेत. म्हणजे नशामुक्ती अभियान निरोगी जीवन आणि आनंददायी समाज घडविण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे. त्यासाठी देशातील तरुणाईमध्ये नशामुक्ती विषयी जनजागृती अतिशय महत्त्वाची आहे. काही ठिकाणी नशा करून गळफास घेतल्याची उदाहरणे आहेत. तसेच अपघात झालेले आहेत तरी सुद्धा आकस्मिक मृत्यूची नोंद केली जाते. बस डेपोच्या परिसरात, रेल्वे पटरी, पडीत इमारतीमध्ये, वस्ती नसलेल्या रस्त्याच्या बाजूच्या झुडपात, फुटपाथ, रेल्वे प्लॅटफॉर्मवर इत्यादी ठिकाणी नशा करणारी मुले व वृद्ध व्यक्ती पाहायला मिळतात. यासाठी देशातील प्रत्येक जिल्ह्यात नशामुक्तीसाठी जनजागृती झाली पाहिजे. त्यासाठी मादक द्रव्यांच्या सेवनामुळे होणारे वाईट परिणाम सुजाण नागरिकांना सांगावे लागतील. यामध्ये सामाजिक संस्था, शिक्षण संस्था, विविध स्वयंसेवी संस्था अशा संस्थांमार्फत जनजागृतीची मोहीम हाती घ्यावी. तसेच त्या आनुषंगाने विविध कार्यक्रम राबविण्यात यावेत. व्यसनाधीन झालेल्या नागरिकांचे सुद्धा योग्यप्रकारे समुपदेशन करून त्यांचे पुनर्वसन करण्यात यावेत. यातून निरोगी समाज कसा निर्माण करता येईल त्या दृष्टिकोनातून मादक द्रव्यांचे प्रमाण कमी कसे करता येईल, त्याप्रमाणे प्रयत्न करावा. यातून देशात निरोगी समाज निर्माण करता येईल. याचा चांगला परिणाम लोकांचे सरासरी आयुर्मान वाढण्याला मदत होणार आहे. याला कारण वैद्यकीय सेवा आणि पोषण आहार म्हणता येईल. याच्या जोडीला नशामुक्ती महत्त्वाची आहे. सध्या देशात मादक द्रव्यांचा विचार केल्यास यात तरुण पिढी जास्त आहारी गेलेली दिसत आहे. यामुळे विकसित भारत राष्ट्र कसे होणार? केवळ जनजागृती करून चालणार नाही, तर शासन पातळीवर कायदेशीर कारवाई होणे आवश्यक आहे.

# साठेबाजांच्या स्वप्नांचा चक्काजाम!

## रिसोडमध्ये इंधन तुटवड्याच्या अफवांना 'पूर्णविराम'

**रिसोड** गेल्या ४८ तासांपासून रिसोड शहरात सुरू असलेल्या इंधनाच्या महासंग्रामाला अखेर पूर्णविराम मिळाला आहे. पेट्रोल आणि डिझेल संपणार असल्याच्या वावटळीमुळे सर्वसामान्यां पासून ते साठेबाजांपर्यंत सर्वांचीच धावपळ उडाली होती.मात्र, इंधनाचा पुरवठा सुरळीत झाल्याने आता पंपांवरील शुकशुकाट वाढला असून साठेबाजी करणाऱ्यांचे मनसुबे धुळीस मिळाले आहेत.

दोन दिवसांपूर्वी अचानक "इंधन संपणार" अशी चर्चा वाऱ्यासारखी पसरली.या अफवेने रिसोडकरांना अक्षरशः वेड लावले.पंपांवर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.



काही महाभागांनी तर भविष्यातील टंचाईचा विचार करून चक्क ५०-५० लिटरचे कॅन भरून साठवणूक सुरू केली होती."आधी मला द्या" यावरून पंपांवर वादावादीचे प्रसंगही ओढवले. अफवेमुळे निर्माण झालेली ही कृत्रिम टंचाई साठेबाजांसाठी पर्वणीच ठरत होती.

इंधनाचा साठा मुबलक उपलब्ध असताना केवळ भीतीपोटी नागरिक साठवणूक करत असल्याचे चित्र होते.मात्र,आज दोन दिवसांच्या विश्रांतीनंतर पेट्रोल पंपांवर पुन्हा इंधन टँकर्स दाखल झाले.प्रशासकीय पातळीवरही हालचाली झाल्याने गोंधळ थांबला. अफवेवर विश्वास ठेवून लिटर-लिटरसाठी भांडणारे नागरिक आता शांत झाले असून,साठवणूक केलेल्या कॅनचे आता करायचे काय? असा प्रश्न साठेबाजांना पडला आहे.

### सावध राहा, अफवांना बळी पडू नका!

■ इंधन पुरवठा हा तांत्रिक कारणांमुळे एखाद वेळी विस्कळीत होऊ शकतो,पण तो कायमचा बंद होत नाही. रिसोडमधील या दोन दिवसांच्या गोंधळाने हे सिद्ध केले की,अफवा इंधनापेक्षा जास्त वेगाने पेट घेतात.आता परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणात असून,नागरिकांनी अनावश्यक साठवणूक टाळावी आणि अफवा पसरवणाऱ्यांपासून सावध राहावे,असे आवाहन करण्यात येत आहे.

-गणेश तांगडे
निरिक्षण अधिकारी पुरवठा विभाग

# खाजगीत महागडी ठरणारी 'एचपीव्ही' लस आता जिल्हा रुग्णालयात मोफत

## ■ मुलींना गर्भाशय मुखाच्या कर्करोगापासून सुरक्षित करण्याचे जिल्हा शल्यचिकित्सकांचे आवाहन

वाशिम,दि.२४ मार्च (जिमाका) महिलांमध्ये वाढत्या गर्भाशय मुखाच्या कर्करोगाचे (उशआँळलरश्र उरपलशअॅ) प्रमाण रोखण्यासाठी 'एचपीव्ही' (क्क्षत) लसीकरण हा प्रभावी उपाय ठरत आहे. खाजगी रुग्णालयांमध्ये हजारो रुपये किंमत असलेली ही लस आता जिल्हा सामान्य रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय आणि प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये पूर्णतः मोफत उपलब्ध करून देण्यात आली आहे. जिल्हा प्रशासनाने जास्तीत जास्त मुलींनी या सुविधेचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

**स्वतःच्या मुलीसाठी मोजले होते १५ हजार; आता शासनाकडून मोफत**

या लसीकरणाचे महत्त्व अधोरेखित करताना जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अनिल कावरखे यांनी आपला वैयक्तिक अनुभव कथन केला. ते म्हणाले, काही वर्षांपूर्वी ही लस शासकीय स्तरावर उपलब्ध नव्हती, तेव्हा मी माझ्या मुलीच्या आरोग्यासाठी खाजगी बाजारातून १५ हजार रुपयांपेक्षा जास्त किंमत मोजून ही लस खरेदी केली होती. त्यावेळी सामान्य कुटुंबांना हा खर्च परवडणारा नव्हता. मात्र, आता हीच महागडी आणि दर्जेदार लस शासनामार्फत मोफत दिली जात आहे. पालकांनी कोणताही संकोच न बाळगता आपल्या मुलींचे लसीकरण करून घ्यावे.

**खाजगीतील 'गार्डासिल' आता सर्वसामान्यांच्या आवाक्यात**

बाजारात 'गार्डासिल' सारख्या एचपीव्ही लसींची किंमत अत्यंत जास्त आहे. सर्वसामान्य कुटुंबातील मुलींना हा खर्च परवडत नसल्याने केंद्र व राज्य शासनाने ही लस शासकीय रुग्णालयांत उपलब्ध करून दिली आहे.

ही लस सुरक्षित असून तिचे कोणतेही गंभीर दुष्परिणाम नाहीत, असे आरोग्य विभागाने स्पष्ट केले आहे. महत्त्वाची माहिती : कोणासाठी : प्रामुख्याने १४ ते १५ वयोगटातील मुलींसाठी ही लस सर्वाधिक प्रभावी आहे. कुठे मिळेल: जिल्हा सामान्य रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय आणि नजीकच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात. किंमत: शासकीय केंद्रांवर पूर्णपणे मोफत. भविष्यातील कर्करोगाचा धोका टाळण्यासाठी आरोग्य विभागाने जिल्ह्यातील पालकांना या मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

# जिल्हाधिकारी कार्यालयात शहीद क्रांतिकारींना अभिवादन

वाशिम, दि. २३ मार्च (जिमाका) भारतीय स्वातंत्र्य लढ्यात महत्त्वाचे योगदान देणारे शहीद क्रांतिकारी भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांना शहीद दिनानिमित्त २३ मार्च रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील वाकाटक सभागृहात आयोजित कार्यक्रमात अभिवादन करण्यात आले. जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी शहीद क्रांतिकारींच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे यांच्यासह विविध विभागांचा अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही शहीद क्रांतिकारींच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून आदरांजली वाहिली.

# दडपणाला हरवून 'त्रिशा' बनली खाकीची शान

## ▶▶ दापुरी खुर्दच्या लेकीची पुणे पोलीस दलात ऐतिहासिक भरारी

स्वप्न उरात बाळगून, परिस्थितीच्या काट्यावरून चालत गेलेल्या दापुरी खुर्द येथील एका शेतकरी कन्येने पुन्हा एकदा सिद्ध केले की, जिद्द असेल तर ध्येय गाठणे अशक्य नाही.पुणे शहर पोलीस भरती मध्ये घवघवीत यश संपादन करत कुमारी त्रिशा सोपान भालेराव हिने थेट पोलीस दलात स्थान मिळवले आहे.तिच्या या यशाने केवळ कुटुंबाचेच नव्हे,तर संपूर्ण गावाचे नाव उज्ज्वल केले आहे.त्रिशाच्या यशाचा प्रवास तितकासा सोपा नव्हता. शेतकरी कुटुंबाची पार्श्वभूमी असल्याने आर्थिक चणचण आणि प्रतिकूल परिस्थितीचे सावट होतेच.मात्र,या परिस्थितीला नमवण्याचा निर्धार करत त्रिशाने स्वतःच्या कष्टावर आणि आत्मविश्वासावर लक्ष केंद्रित केले.मैदानी चाचणी पासून ते लेखी परीक्षेपर्यंत तिने घेतलेली जिद्द फळाला आली.पुणे शहर पोलीस भरती प्रक्रियेत अत्यंत चुरशीच्या स्पर्धेत तिने तब्बल १२६ गुण मिळवत गुणवत्तेच्या यादीत (मेरिट) मानाचे स्थान पटकावले आहे."माझ्या यशाचे पूर्ण श्रेय माझे आई-वडील, भाऊ-बहीण आणि काका-काकू यांना जाते. त्यांच्या समर्थनाशिवाय हे स्वप्न पूर्ण करणे अशक्य होते," अशी भावना त्रिशाने व्यक्त केली. तसेच,आपल्या यशात गुरुजनांचे मार्गदर्शन महत्त्वाचे असल्याचेही तिने आवर्जून सांगितले.त्रिशाच्या या नेत्रदीपक यशाची बातमी दापुरी खुर्दमध्ये पोहचताच गावकऱ्यांनी एकच जल्लोष केला.परिसरातील नागरिकांनी तिच्या घराबाहेर शुभेच्छांचा वर्षाव केला आहे. ग्रामीण भागातील मुलींनी परिस्थितीवर मात करून प्रगती करावी,यासाठी त्रिशाचे यश नक्कीच प्रेरणादायी ठरले आहे.तिचे सर्व स्तरातून अभिनंदन होत असून,भावी पोलीस अधिकारी म्हणून तिची कारकीर्द यशस्वी होवो,अशा शुभेच्छा तिला दिल्या जात आहेत.



पिंगलाक्षी एक्सप्रेस (मराठी साप्ताहिक ) I R.N.I. No. MAHMAR/2008/24720
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक गजानन श्रीराम बानोरे यांनी दिप प्रिंटर्स (मुद्रक - राम उत्तमराव सालवणकर) वारा जहां. ता.जि.वाशीम येथे छापून कार्यालय, साप्ता. पिंगलाक्षी एक्सप्रेस, सिध्दी विनायक शिक्षक कॉलनी, मु.पो. ता. रिसोड जि. वाशीम (महा.) येथून प्रकाशित केले. (सर्व वाद रिसोड न्यायालया अंतर्गत) प्रकाशित असलेल्या सर्व लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी.आर.बी. ॲक्ट नुसार संपादक जबाबदार)

# एस आय आर प्रकिये मध्ये बि एल ओ चा काम चुकारपणा

## फैय्याज अहेमद यांची मतदार नोंदणी अधिकारी कडे तक्रार



**रिसोड /नाजीम खान –** एस आय आर प्रक्रियेसाठी नियुक्त केलेले बीएलओ हे आपल्या कामांमध्ये कामचुकारपणा करत आहेत ते प्रत्यक्ष घरोघरी पोहोचत नसून घरबसल्या फोनवर सदर प्रक्रिया करत आहे. यामध्ये सामान्य मतदारांची कुचंबना होत आहे. सामान्य मतदार पर्यंत सदर बि एल ओ पोहोचत नसून ते त्यांच्या कामचुकारपणा मुळे असंख्य मतदार हे मतदारांपासून वंचित राहण्याची भीती आहे. यामुळे सदर प्रकरणी गांभीर्याने लक्ष घालून कामचुकार बि ए ओ ना ताकीद करण्यात यावी जेणेकरून सदर काम काळजीपूर्वक करतील अशी तक्रार माजी नगरसेवक फय्याज अहमद यांनी मतदार नोंदणी अधिकारी यांच्याकडे दिनांक २७ मार्च रोजी केली आहे. तक्रारीत नमूद करण्यात आले आहे की रिसोड शहरा मध्ये मतदार एस आय आर प्रकिया नुसार नोंदणी सुरु आहे. त्या अनुषंगाने नगर परिषद रिसोड मध्ये तहसीलदार यांनी राजकीय पक्षाच्या पदाधिकारी व नगर सेवक यांना सोबत घेऊन दि. २४/०३/२०२६ रोजी नगर परिषदेच्या संभागृहा मध्ये मिटिंग आयोजित करण्यात आलेली होती त्या मिटिंग मध्ये तहसीलदार रिसोड यांनी आहावान केला होता कि बि एल ओ ला आपल्या परिसरा मध्ये राजकीय पक्षाच्या पदाधिकारी व नगर सेवक यांना सोबत घेऊन नागरीकांन मदत करावी असे अहवान करण्यात आले होते. तरी रिसोड शहरा मध्ये काही बि एल ओ आपले काम करतच नाही त्या मध्ये यादी क्रमांक २८७ नंदाकुले, २८४ पुस्लेकर व ३०२ बोरकर मैडम, ३०६ खनपट्टे हे चार हि बि एल ओ. आपले काम करीत नाही या मुळे नागरीकांना बर्याच प्रकारे त्रास सहन करावा लागत आहे व यांच्या या कार्य मुळे नागरिक या नोंदणी प्रकियेतून वंचित राहावे लागत आहे. तरी या विषयाकडे लक्ष घालून सदर बि ए ओ ना एस आय आर प्रक्रिया योग्यरीत्या करण्यास संबंधित आदेशित करावे असे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. यावेळी प्रा विजय तुरुकमाने, गजानन निखाते,साजिद खान, तारीक खान, युसुफ मंसुरी, मोहम्मद जमील,आदी उपस्थित होते.

# हळद काढणीचे दर भिडले गगनाला

**रिसोड** : सांगलीनंतर हिंगोली वाशिम जिल्हा हळदीच्या उत्पादनात राज्यात अग्रेसर मानल्या जातो. यंदा जिल्हयात तब्बल ५० हजार हेक्टर क्षेत्रावर हळदीची लागवड झाली. परंतु, अतिवृष्टीमुळे हळदीच्या पिकावर कंदसड रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने उत्पादन घटले. एकीकडे उत्पादन घटले असताना दुसरीकडे हळद काढणीच्या मजुरीचे दर तब्बल १४ हजारांच्या घरात जाऊन पोहोचल्याने हळद उत्पादकांसमोरील अडचणी बाढल्या आहेत. रिसोड तालुक्यात मागील दहा वर्षापासून जिल्ह्यात हळदीची लागवड वाढत आहे. मागील तीन वर्षांपासून हळदीला समाधानकारक दर मिळत असल्याने बहुतांश शेतकऱ्यांचा ओढा हळदीच्या लागवडीकडे बाढला आहे. यंदा जवळपास ५० हजार हेक्टर क्षेत्रावर हळदीची लागवड झाल्याचा अंदाज आहे. मागील पंधरवड्यापासून हळदीची काढणी सुरू झाली आहे. परंतु, हळद काढणीसाठी मजुरांची परजिल्ह्यातील मजूर कामावर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात हळदीची लागवड झाल्याने स्थानिक मजुरांची टंचाई जाणवत आहे. परिणामी, इतर जिल्ह्यातील मजुरांनाहळद काढणीसाठीआणावे लागत आहे.

स्थानिक मजुरांपेक्षा परजिल्ह्यातील मजुरांसाठी अधिकची मजुरी मोजावे लागत असल्याने हळद उत्पादक शेतकऱ्यांच्या लागवडीचा खर्च वाढला आहे. प्रचंड टंचाई जाणवत आहे. अडचण हळद काढणीसाठी एकरी १२ ते १४ हजार रुपये मोजावे लागत आहेत. (श. प्र.)

# बांगर यांच्या जलपात्र उपक्रमाने पुन्हा घुमणार चिवचिवाट

रिसोड - एकेकाळी प्रत्येक घराच्या अंगणात, तावदानावर आणि गच्चीवर आपल्या गोड चिवचिवाटाने सकाळ प्रसन्न करणारी चिमणी आजच्या आधुनिक युगात दुर्मिळ होत चालली आहे. निसर्गाशी घट्ट नाते सांगणारा हा लहानसा पक्षी आता शहरांमधून हळूहळू गायब होत असल्याचे चिंताजनक चित्र आहे. वाढते शहरीकरण, झपाट्याने होणारे पर्यावरणीय बदल, मोबाईल टॉवरमधून होणारे किरणोत्सर्ग, तसेच झाडांची घटती संख्या या सर्व कारणांमुळे चिमण्यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. अशा परिस्थितीत रिसोड येथील पक्षप्रेमी विनोद बांगर यांनी पुढाकार घेत एक अत्यंत प्रेरणादायी आणि समाजाभिमुख उपक्रम राबवून चिमण्यांच्या संवर्धनासाठी आशेचा किरण निर्माण केला आहे.



जागतिक चिमणी दिनाचे औचित्य साधत त्यांनी रिसोड शहरासह तालुक्यातील विविध भागांमध्ये नागरिकांच्या घरांवर, गच्चींवर आणि अंगणात चिमण्यांसाठी विशेष जलपात्र व टोपल्या लावण्याचा उपक्रम सुरू केला. या उपक्रमाअंतर्गत आतापर्यंत सुमारे १०० जलपात्रे आणि टोपल्या बसविण्यात आल्या असून, यामुळे चिमण्यांना सुरक्षित निवारा आणि पिण्यासाठी पाणी उपलब्ध झाले आहे.

फक्त एवढ्यावरच न थांबता, पुढील उन्हाळ्याच्या तीव्रतेचा विचार करता एप्रिल, मे आणि जून या तीन महिन्यांत आणखी ३०० जलपात्रे व टोपल्या बसविण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे. उन्हाळ्यातील कडक उन्हामुळे अनेक पक्षी आणि प्राणी पाण्याअभावी जीव गमावतात. ही गंभीर बाब लक्षात घेऊन हा उपक्रम अधिक व्यापक करण्याचा त्यांचा मानस आहे.

या उपक्रमामुळे समाजात पर्यावरण संवर्धनाबाबत जागरूकता निर्माण होत असून, अनेक नागरिकही यात उत्साहाने सहभागी होत आहेत. काहींनी आपल्या घरासमोर, तर काहींनी गच्चीवर जलपात्रे ठेवण्यास सुरुवात केली आहे.

प्रत्येकाने आपल्या घरासमोर एक जलपात्र ठेवले, तर चिमण्यांसह इतर पक्ष्यांनाही मोठा दिलासा मिळू शकतो, असा संदेश विनोद बांगर यांनी दिला. या छोट्याशा उपक्रमातून मोठा बदल घडवून आणण्याचा प्रयत्न होत असून, पुन्हा एकदा घराघरांत चिमण्यांचा चिवचिवाट घुमावा, सकाळी निसर्गाच्या गोड सुरांनी दिवसाची सुरुवात व्हावी, अशी सर्वांची अपेक्षा आहे. (वि. प्र)

# ई-केवायसीसाठी लक्ष्मी महिलां संस्थेचा पुढाकार



रिसोड : तालुक्यातील निजामपूर येथे लक्ष्मी महिला संस्थेच्या वतीने लाडकी बहीण योजना अंतर्गत पात्र महिलांची ख्ख्ण प्रक्रिया सुलभ व्हावी यासाठी उपक्रम राबविण्यात येत आहे गावातील अनेक महिलांना ऑनलाईन प्रक्रिये बाबत अडचणी येत असल्याने संस्थेच्या माध्यमातून त्यांना मार्गदर्शन करून ख्ख्ण पूर्ण करून दिली जात आहे. या उपक्रमाबाबत संस्थेच्या चेअरमन सो. लक्ष्मी रमेश पिंगळे यांनी सांगितले की शासनाच्या योजनेचा लाभ प्रत्येक पात्र महिलेला मिळावा, यासाठी हा उपक्रम सातत्याने राबविला जात आहे. या कार्यात सचिव विमल सखाराम हटकर तसेच सदस्य प्रियंका गजानन पुरी विमल भीमराव पिंगळे अनिता गणेश पिंगळे सोनू दिलीप वाघमोडे वैशाली प्रकाश बुद्धनेर वैशाली संदीप पिंगळे आशा रमेश किर्श्वे सोनूताई अमोल कोल्हारे कविता गोपाल मिटकरी शारदा गजानन शेंडगे या महिलानी सक्रियपणे सहभाग घेतला आहे

# आखाती युद्धाचा सर्वाधिक फटका कृषी व्यवसायाला

## पी.डी. पाटील : किंमती वाढल्या तर शेतमालाचे भाव घसरले

रिसोड, ता. २८ : जवळपास तीन आठवड्यांपेक्षा अधिक कालावधीपासून सुरू असलेल्या आखाती युद्धाचा सर्वाधिक फटका कृषी व्यवसायाला बसला आहे. आयात व निर्यात ठप्प झाल्यामुळे शेतीला लागणाऱ्या साहित्यात २५ टक्क्यांनी वाढ झाली आहे, तर शेतमालाच्या किंमती मोठ्या प्रमाणात घसरल्या आहेत. शेती व्यवसायावर थेट परिणाम झाल्यामुळे येणारा खरीप हंगाम विस्कळीत होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.




मागील तीन आठवड्यांपेक्षा अधिक कालावधीपासून सुरू असलेल्या आखाती युद्धाचा थेट परिणाम कृषी व्यवसायावर आणि कृषी उत्पादनाच्या किंमतीवर झाला आहे. परिणामी शेतकऱ्यांच्या अडचणी वाढल्या आहेत. खरीप हंगाम दोन महिन्यांवर येऊन ठेपला आहे. रब्बीची पिके हाती आली असली तरी भावात मोठ्या प्रमाणात घसरण झाली आहे. हळदीच्या दरात तर तीन ते चार हजार रुपयांची घसरण झाली आहे. कांद्याचे भाव तर पाच रुपये ते १२ रुपये दरम्यान झाले आहेत. सर्वच शेतमालाचे भाव घसरल्यामुळे शेतकऱ्या समोर मोठे आर्थिक संकट निर्माण झाले आहे.

खरीप हंगाम दोन महिन्यांवर येऊन ठेपला आहे. शेतकरी खरिपाच्या तयारीला लागला आहे. इंधनाच्या दरात वाढ झाली असली तरी डिझेल वेळेत मिळत नसल्यामुळे मशागतीचा प्रश्न निर्माण झाला असून मशागतीचा खर्च वाढला आहे. बारदाना, ताडपत्री, तुषार व ठिबक सिंचनाचे साहित्य, प्लास्टिकच्या वस्तू व पीयूसी पाईप, लोखंडी वस्तू, कृषी निविष्ठा यांच्यासह शेतीला लागणाऱ्या इतर साहित्यांच्या किंमतीत २५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. त्यामुळे शेतकरी मोठ्या आर्थिक अडचणीत सापडला आहे.

इंधनासह खते व कृषी निविष्ठांच्या किंमती अजूनही वाढण्याची शक्यता वर्तविण्यात येत असल्यामुळे शेतकरी कमालीचा धास्तावला आहे. शासनाकडून तोंडी मलमपट्टी करण्यात येत असली तरी प्रत्यक्षात मात्र शेती व्यवसाय व निगडित क्षेत्रामध्ये भयावह परिस्थिती निर्माण झाली आहे. एकंदरीत आखाती युद्धाचा थेट परिणाम शेती व शेतीशी निगडित व्यवसायावर झाला असल्यामुळे येणारा खरीप हंगाम विस्कळीत होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

# सुसाट वेगात धावणाऱ्या वाहनांना आवर घाला



रिसोड : शहरात सुसाट वेगात धावणाऱ्या वाहनांवर आवर घालण्याची मागणी वाहनधारकांसह पादचाऱ्यांतून होत आहे. शहरातील मुख्य मार्गासह शहरांतर्गत मार्गावरूनही काही युवक भरधाव वेगात वाहने चालवितात.

तसेच कर्णकर्कश आवाजाचे हॉर्न वाजवून जवळून वाहनं काढतात. सदर आवाजाने व भरधाव वेगतील वाहनामुळे जवळचा वाहनधारक तसेच पादचारी दचकून जातो. अशातच वाहनधारकाचा वाहनावरील नियंत्रण सुटून अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नसून पादचाऱ्यांनाही अपघाताचा धोका संभवतो. शहरातील बाजारपेठांमध्ये नागरिकांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते, या गर्दीतही काही युवक भरधाव वाहने चालवित कर्णकर्कश आवाजाचे हॉर्न वाजवित जात आहे. यामुळे नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण होण्याची शक्यता असताना देखील वाहतूक शाखेकडून या सुसाट वेगात धावणाऱ्या वाहनधारकांवर दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे. या सुसाट वेगात धावणाऱ्या वाहनांवर आवर घालण्याची मागणी वाहनधारकांसह पादचाऱ्यांतून होत आहे. श. प्र.

# राष्ट्रीय मुक्त शिक्षण संस्थेच्या (एनआयओएस) सार्वजनिक परिक्षा शुक्रवार, १० एप्रिल २०२६ पासून सुरु होणार

पुणे - राष्ट्रीय मुक्त शिक्षण संस्था (एनआयओएस) दर वर्षी एप्रिल-मे मध्ये आणि ऑक्टोबर-नोव्हेंबर मध्ये, अशी दोनदा एनआयओएस मुख्यालयाने निश्चित केलेल्या तारखांना सार्वजनिक परीक्षेचे आयोजन करत असते. महाराष्ट्र आणि गोवा या राज्यांमध्ये विहित परीक्षा केंद्रांवर दिनांक १० एप्रिल २०२६ पासून माध्यमिक आणि उच्च माध्यमिक अभ्यासक्रमासाठीच्या एनआयओएस सार्वजनिक परीक्षा (थिअरी)होणार आहेत.

# श्री. शिवाजी विद्यालय मोप च्या कु. रेखा करंगे यांचा हैद्राबाद हिंदी नवीकरण पाठ्यक्रम प्रशिक्षणासाठी निवड

**रिसोड प्रतिनिधी ३०/मार्च**
**श्री शिवाजी विद्यालय मोप येथील शिक्षिका कु. रेखा तुळशीराम करंगे यांची केंद्रीय हिंदी संस्था हैदराबाद येथे ४९४ व्या हिंदी नवीकरण पाठ्यक्रम प्रशिक्षणाकरिता प्रशिक्षणार्थी म्हणून दिनांक १६/०३/२०२६ ते २८/०३ २०२६ या कालावधीमध्ये निवड झाली होती. माध्यमिक विद्यालयातील हिंदी विषय शिक्षकांसाठी असलेले प्रशिक्षण वरील कालावधीत पूर्ण करण्यात आले.**



या प्रशिक्षणामध्ये क्षेत्रिय निदेशक डॉ.फत्ताराम नायक, डॉ.दीपेश व्यास, डॉ. राजीव कुमार सिंह, डॉ. सी कामेश्वरी यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले.

सर्वप्रथम कार्यक्रमाच्या मुख्य अतिथीचे स्वागत सत्कार महाराष्ट्राची शान शेला-टोपी व पुष्पगुच्छ देऊन करण्यात आले. स्वागत गीत व शालेय संबंधित नृत्य कु.रेखा करंगे कु.पूजा भोयर श्री.गजानन चौधरी श्री.आशिष भास्कर यांनी सादर करून वाशिम जिल्ह्याचे प्रतिनिधित्व केले

श्री वाकुडकर सर, श्री हजारे सर, श्री दीक्षित सर श्री.वाकुडकर सर श्री.शिंदे सर यांनी स्वरचित कविता सादर करून प्रशिक्षणार्थींची मने जिंकली. श्री.अभोरे,चव्हाण सर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तसेच श्री आशिष यांनी 'कभी अलविदा न कहना' हे गाणे म्हणून भावविवश केले. अध्यक्षीय भाषणामध्ये केंद्रीय हिंदी संस्था आगराचे निदेशक सुनील बाबुराव कुलकर्णी यांनी प्रतिभाशाली राष्ट्रनिर्मिती करिता हिंदी भाषा एक प्रभावी माध्यम आहे असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शक प्रो.दोड्डा शेषु बाबु यांनी आपल्या देशात विविधतेमध्ये एकता असून हिंदी भाषा कशा पद्धतीने सर्व राज्यांना जोडून ठेवण्याचे कार्य करते हे पटवून सांगितले.

हिंदी नवीकरण पाठ्यक्रम ऑनलाईन परीक्षेचे प्रथम पाच स्पर्धकांना प्रमाणपत्र वितरित करून बक्षीस देण्यात आले.

यामध्ये श्री.समाधान गुडदे,श्री.नरेश चव्हाण,श्री.गजानन चौधरी, कु.रेखा करंगे, कु.पूजा भोयर यांचा समावेश होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. रेखा करंगे कु.पुजा भोयर यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री.प्रशांत शिंदे यांनी केले राष्ट्रगीत व महाराष्ट्र राज्य गीत गायन करून कार्यक्रम संपन्न झाला.

## आयुर्वेद महाविद्यालयात डॉक्टर्स डे व व्हाईट कोट समारंभ उत्साहात




रिसोड - आयुर्वेद कॉलेज, हॉस्पिटल व रिसर्च सेंटर, पुंडलीक नगर, देगाव येथे दि. ३० मार्च २०२६ रोजी डॉक्टर्स डे तसेच व्हाईट कोट सिरॅमनी कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. सदर कार्यक्रमाचे आयोजन महिला उत्कर्ष प्रतिष्ठान, सेक्शन ८ कंपनीच्या अध्यक्षा आ. भावनाताई गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

कार्यक्रमास डॉ. प्राचार्य रघुनाथ राऊत, व्यवस्थापनाचे नरेश नळदकर, भुजंगराव जाधव, प्रतिक रेवणवार, विवेक उपलेंचवार, कार्यालय अधीक्षक चापेश्वर गांगवे, डॉ. दीपक ढोणे, डॉ. प्रतिभा ढोणे व डॉ. रुपाली बाजड यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी समयोचित भाषणातून वैद्यकीय क्षेत्रातील जबाबदाऱ्या, सेवा वृत्ती आणि विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्याबाबत मार्गदर्शन केले.

व्हाईट कोट समारंभाद्वारे विद्यार्थ्यांना वैद्यकीय क्षेत्रात प्रवेश करताना आवश्यक असलेल्या कर्तव्यांची जाणीव करून देण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन परजादा मुद्तसीर यांनी केले. व्हाईट कोट वाटपानंतर कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

## वित्तीय स्वरूपाच्या पदासाठी कोणतीही पदवी ग्राह्य – राज्यमंत्री ॲड.आशिष जयस्वाल

मुंबई, दि. २३ : राज्यातील विविध शासकीय व निमशासकीय कार्यालयांमधील वित्तीय स्वरूपाच्या जबाबदारीच्या पदांसाठी केवळ वाणिज्य शाखेची अट न ठेवता कोणतीही पदवी ग्राह्य धरण्याचा निर्णय गुणवत्ताधारक उमेदवार मिळावेत आणि रिक्त पदे भरली जावीत, यासाठी घेण्यात आल्याचे राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले. याबाबत सदस्य निरंजन डावखरे यांनी प्रश्न उपस्थित केला. राज्यमंत्री आशिष जयस्वाल म्हणाले, २०१२ पूर्वी अशा पदांसाठी कोणतीही विशिष्ट शाखेची अट नव्हती. मात्र, २०१२ नंतर अटी घालण्यात आल्या. त्यानंतरच्या काळात गुणवत्ता असलेले उमेदवार पुरेशा प्रमाणात मिळत नसल्याने, अनेक पदे रिक्त राहत असल्याचे निदर्शनास आले. भारताचे लेखा नियंत्रक व महालेखापाल, आयआरएस, जीएसटी यांसारख्या इतर महत्त्वाच्या सेवांमध्ये वाणिज्य शाखेची सक्ती नसल्याचा दाखला देत, राज्यानेही त्या धर्तीवर धोरण अवलंबल्याचे त्यांनी नमूद केले. संबंधित पदांवरील काम केवळ अकाउंटिंगपुरते मर्यादित नसून ते सर्वसमावेशक कार्यालयीन कामकाजाशी संबंधित असल्याने विविध विषयांचे ज्ञान असलेले उमेदवार आवश्यक ठरतात, असेही त्यांनी स्पष्ट केले. सद्य:स्थितीत महाराष्ट्र लेखा व कोषागारे संचालनालयांतर्गत, सामान्य प्रशासन विभागाच्या नियमानुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरली जाणारी कनिष्ठ लेखापाल आणि लिपिक-टंकलेखक हीच गट-क संवर्गातील पदे आहेत, ज्यासाठी सेवाप्रवेश नियमांत बदल करून कोणतीही पदवी ही शैक्षणिक अर्हता करण्यात आली आहे, असे त्यांनी यावेळी सांगितले.

## प्रा. पल्लवी रमेशराव देशमुख यांना पीएच.डी.प्रदान



रिसोड -स्व.पुष्पादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालय रिसोड महाविद्यालयातील प्रा.कु. पल्लवी रमेशराव देशमुख यांनी गृह-अर्थशास्त्र या विषयामध्ये पीएच.डी. पदवी यशस्वीरीत्या पूर्ण केली आहे. व त्याचे औचित्य साधून महाविद्यालयाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. सत्कार प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष मा..बाबारावजी पाटील संस्थेचे सचिव मा..अमितभाउ पाटील मा.. सिद्धार्तजी खरात(आमदार,मेहकर-लोणार विधानसभा मतदार संघ तथा अधिसभा सदस्य, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,अमरावती),मा..आशिषभाऊ रहाटे (उपजिल्हा प्रमुख,शिवसेना (उबाठा)सदस्य,जिल्हा परिषद,बुलढाणा)मा.डॉ..जे.बी.देव हडे (कार्यकारी अधिकारी उ.शि.जीवन विकास शिक्षण संस्था),महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम.एन.गायकवाड यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी,विद्यार्थी यांची बहुसंखेने उपस्थिती होती. त्यांच्या कार्याचे शैक्षणिक क्षेत्रात कौतुक होत आहे. त्यांच्या या यशाबद्दल कुटुंबीय, मित्रपरिवार तसेच सहकाऱ्यांनी अभिनंदन केले आहे. भविष्यात संशोधन व अध्यापन क्षेत्रात अधिक प्रगती करण्याचा त्यांचा मानस असून समाजासाठी उपयुक्त असे कार्य करण्याची त्यांनी इच्छा व्यक्त केली आहे.(वि. प्र)

## श्रीराम नवमी निमित्त रिसोडमध्ये भक्तीभावाचा सागर

### संत अमरदास बाबा दुर्गा मंडळाकडून महाप्रसादाचे वाटप



**रिसोड:** शहरात सामाजिक व धार्मिक कार्यात नेहमीच अग्रेसर असलेल्या संत अमरदास बाबा दुर्गा मंडळाने यंदाच्या राम नवमी उत्सवानिमित्त भक्तांसाठी महाप्रसाद वाटपाचा स्तुत्य उपक्रम राबविला. या उपक्रमामुळे संपूर्ण परिसरात भक्ती, एकोपा आणि सामाजिक बांधिलकीचे सुंदर दर्शन घडले. संत अमरदास बाबा दुर्गा मंडळ, हनुमान मंदिर महाप्रसाद उत्सव मंडळ तसेच गोपाल मगर मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम उत्साहात पार पडला. मंडळाच्या वतीने वर्षभर विविध सामाजिक उपक्रम राबविले जात असून, गरजूंना मदत, धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन आणि समाजहिताचे कार्य हे मंडळाचे वैशिष्ट्य आहे. श्रीराम नवमीच्या पवित्र दिवशी सकाळपासूनच मंदिर परिसरात भाविकांची मोठी गर्दी झाली होती. भगवान श्रीरामांच्या प्रतिमेचे पूजन, आरती आणि भजनाच्या वातावरणात भक्तांनी दर्शन घेतले. त्यानंतर सर्व भाविकांना प्रेमाने आणि आदराने महाप्रसाद वाटप करण्यात आले. या प्रसंगी सर्वत्र भक्तिमय आणि आनंदी वातावरण निर्माण झाले होते. या महाप्रसाद वाटप उपक्रमासाठी मंडळाचे कार्यकर्ते गोपाल मगर, राम जाधव, विठ्ठल नेमाडे, गजानन लिंगे, सचिन गांजरे, अक्षय नेमाडे, संतोष खोडके, कैलास राजूरकर, मधू तांबटकर, गणेश दळवी, लक्ष्मण हमाने, उबेद पठाण, मधु जाधव, बनवारी चोमवाल पवन पिंपळे, बाळू पुरोहित

लक्ष्मण जहिरव आदींनी विशेष परिश्रम घेतले. त्यांच्या समर्पित कार्यामुळे कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. या उपक्रमामुळे समाजात एकात्मता, बंधुता आणि धार्मिक श्रद्धेचा संदेश देण्यात आला असून, नागरिकांकडून मंडळाच्या या कार्याचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे. (शहर प्रतिनीधी)